# प्रभु तरुण

| वर्ष ५६ | अंक ०२ | मुंबई | १६ ऑक्टोबर, २०२२ | पाने ६ | किंमत रु. १ |
|---|---|---|---|---|---|

( *स्थापना :* तारीख २५ ऑगस्ट १९२३ )


**तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**


www.prabhutarun.org

*संपादिका:* सुहासिनी कीर्तिकर *कार्यकारी संपादक मंडळ :* मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर


*संपादकीय*

## छायांनी रेखियले

—सुहासिनी कीर्तिकर

मंडळी; दरवर्षीप्रमाणे या दिवाळीतही प्रभुतरुणाच्या दिवाळी अंकाची वाट पहात असाल ना? बरोबरच आहे. दिवाळीत अगदी आठविंद्यापासून आपल्या रितीभाती सुरू होतात. यात 'प्रभुतरुणा'चा दिवाळी अंक वाचणे; या अंगवळणी पडलेल्या आनंददायी कृतीचाही समावेश असतो. पण अनेक बाबतीत तसे आपण सगळेच सहनशील असतोच. आता लॉकडाऊनच्या काळातच नाही का; अनेक गोष्टी आपण सांभाळून घेतल्या, समजून घेतल्या. ऑक्टोबरमध्ये दिवाळी अंक नाही; ही गोष्टही तशीच समजून घ्याल. खात्री आहे माझी. कारण आपला दिवाळी अंक नोव्हेंबरमध्ये येतोय. जरासा आगळावेगळा. 'एनआरआय' मंडळींचं योगदान असणारा. तरुणाईची उत्साही, उसळती लेखणी असणारा. अर्थातच आपले सवयीचे असलेले, दर्जेदार लेखन करणारेही आहेतच नेहमीप्रमाणे. शताब्दीवर्षाच्या सोहळ्याला शोभेलसे. तर मग इथे काय? म्हटलं मनाशी मी की या अंकात गेल्या महिन्यातील वाढदिवसाचेच फोटो देऊया. मैफल संपली तरी सूर मनात रेंगाळतच रहातात ना? आपण नंतर कितीतरी काळ त्यामुळे 'सुरावले' ले... छे! छे!... भारावलेले असतो. अगदी तस्सेच बरं का. प्रभुतरुणाचा साजरा झालेला वाढदिवस आपल्या मनात अजून आनंदाची पालवी फुटत वाढतोच आहे. अगदी मनापासून

(पान २ कॉलम १ वर)













संपादकीय

(पान १ कॉलम २ वरून)

दिलेल्या तुमच्या आशीर्वादाची फुले फुलतच राहिलेली आहेत. मला माहित्येय की तुम्ही ती फुले आत्ताही उधळता आहात. म्हणता आहात की -

'भवतु मंगलम् तव जन्मदिनम्।
चिरंजीव भव, कुरू पुण्यवर्धनम्।।
सुखं जीव, कुरु कीर्तिवर्धनम्।
विजयी भव सर्वत्र सर्वदा।
ज्ञाति भवतु तव यशोभानम्।।२

तर असा 'मंगलमय यशोगानाचा' वाढदिवस आपल्या कॅप्टन अश्विन प्रधान यांनी कॅमेऱ्याच्या डोळ्याने टिपला आहे. शांताबाईच्या ओळी आठवताहेत का तुम्हाला? छायांनी रेखियले चित्र तेच देखणे।' इथे 'चित्र हेच देखणे' आहे. हां; एकमात्र आहे की या डोळ्यात सगळीजण सामावलेली नाहीत. ऐसा तो होता रहता है! खात्री आहे की 'मिसींग' ना हरवून गेल्याची खंत नाही वाटणार. कारण हे फोटो इथे जागेअभावी सगळेच नाही ना देता येणार. समजून घ्या राजे हो...

तर भेटू या पुढल्या अंकी दिवाळी साजरी करायला प्रभुतरुणासंगे. आपले काय हो?... तुम्ही सोबत असलात की अपनी तो 'रोज बने दिवाली!'

# ``WORDPLAY"

**-Armaan Kothare**

In the little neighborhood of Griffin Street, the children are told not to go out of their house after 6pm.

It is because of the local folklore about a stranger, a power or a creature. It is an unwelcome entity. It is said that the creature has a liking for kids. Their tender skin, their innocent souls and confused self's are what lure the creature to consume them. According to the stories so told, the creature eats their bodies and fuses their souls into him, making him stronger. There haven't been any recorded sightings of the creature. Mainly because no adults have seen the creature, and no kids have survived to tell the tale.

However, the attacks of the creature haven't been recorded in the past two years, since the curfew 6pm was made mandatory. Children didn't listen at first, but they soon obliged, as they started to notice some of their dear friends missing. Their bodies were never found, just few drops of their innocent blood.

The attack style of the Griffin creature was like this: after bed-time, there would be a jingling sound and the children would run to the windows. On seeing a box like a present on their doorstep, they'd hurry out, only to find several more similar presents, lined towards the outskirts of the street into the woods.

They would unknowingly follow the trail, oblivious to the mistake the were making and their dark fate. The creature has been assumed to choose the number 6 as its time, as it is the devil's number if written thrice.

It makes a very good time to do a devil-like thing.

When they would go out following the trail, they wouldn't be within earshot of anybody, and by the time the parents find out....it'd be too late.

The creature would be done with child.

Presently, the time in the area is 5:55 pm. All kids are running towards their homes, their hands interlaced with their parents'.

However, the Smiths of the yellow house at the end of the street were having problems getting their seven-year-old inside. The boy was missing, the parents couldn't find him anywhere. They call out his name, "Tim!! Timothy!! Come back darling!" the mother screams, but in vain. The child is nowhere to be seen. The parents turn around and go running in the opposite direction, still screaming for their lad.

The direction opposite to Tim.

The direction opposite to me.

I move towards the boy, concealed by a bush, and muted by me.

I couldn't resist the temptation any longer, so I brought about a change in style..

✳

# आयुष्यातील गमती-जमती

**-विनय त्रिलोकेकर**

## चाळीतील गमती

आमच्या चाळीतील मुले अति वात्रट आणि टवाळखोर! ह्याची टिंगल कर, त्याची छेड काढ, त्यांचे दिवसभर चालूच असायचे. कोणालाही नावे ठेवीत, लहानांपासून वयस्कर लोकांपर्यंत, कोणही त्यातून सुटत नसत. माझे एक काका होते - केशव राव. ते जेव्हा बिल्डींगखालून जात तेव्हा 'बेंद्रे,बोंद्रे-बाद्रुधीन सोलिसिटर' ग्यांग (त्या काकांचे टोपण नाव) ओरडून विचारायचे, ''केसाव राव वाजले किती?''

''माझे घड्याळ बंद आहे,'' काकांचे एकच उत्तर.

''तुमचे घड्याळ बंद की घड्याळ समजत नाही?'' मग एकाच हशा.

वाडीत एक वयस्कर गृहस्थ होते - रामभाऊ. ते जात तेव्हा लपूनछपून आपली 'बेंद्रे, बोंद्रे-बाद्रुधीन सोलिसिटर गॅंगआरोळी ठोकायचे, ''राम भाऊ, धक्के मारू रामभाऊ!''

राम भाऊ खालून ओरडायचे, ''तुमच्या आई बहिणींना पाठवा! त्यांना धक्के मारतो.''

मुलांच्या आईवडलांना कदाचित हे सारे माहित नसावं. टोळीतील मोठ्या मुलांना त्या शिवीगाळीचे काहीच कसे वाटत नव्हते? कोण जाणे!

पण एकदा त्या सर्वांना धडा मिळलाच. त्यांना एक गुरु भेटलाच. वाडीतील एक रहिवाशी, कानिटकर. आयुर्वेदिक काढे बनवणे, दारोदारी जाऊन ते विकणे, हा त्यांचा धंदा. ''कानिटकर, काढे आणा,'' टोळीचा नेहमीचा त्यांना छेड काढण्याचा छंद. पण तो दिवस वेगळा होता. नेहमीप्रमाणे ते काही न बोलताच घरी निघून जरी गेले तरी शांत बसले नव्हते. घरून काढ्यांचे दोन मोठाले पेटारे घेऊन परतले. मधुकाकांच्या घरी जाऊन त्यांना चांगलेच सुनावले, ''काढे विकणे हा माझा धंदा आहे. त्यावर माझे पोट आहे, माझे घर चालते. तुम्ही वडीलधारी माणसे. आपली मुले, तुमची स्वत:ची नसतील. पण तुम्ही त्यांना वडिलांसमान. आता मला काढा आणण्यास सांगितले. एवढे ओझे घेऊन मी वर आलो. हा माझा माल तुम्हाला घेणे भाग आहे.'' मधुकाकांना शंभर रुपयांची फोडणी पडली आणि त्यापुढे कानिटकरांची छेड कोणी काढली नाही.

चित्रपट 'प्यासा' (१९५७) तुम्ही पहिला असाल. त्यातील गाणीतरी ऐकली असतील. शाहिर लुधियानवी यांनी लिहिलेली गीते आणि सचिनदेव बर्मनने संगीतबद्ध केलेली गाणी अतिशय लोकप्रिय आहेत. असे म्हंटले जाते की त्यातील एक गाणे - 'सर जो चकराये, या दिल डूबा जाये, आजा प्यारेपास हमारे, काहे घबराये ... चम्पी तेलमालिशे।', गुरु दत्त ह्यांनी 'Harry Black' या ह्युगो गोनिसच्या ब्रिटीश चित्रपटातील एका गाण्यांनी प्रभावित होऊन आपल्या चित्रपटात हे गाणे नंतर (१९५८) घालण्यास बर्मनदादांना भाग पाडले. असो.

आणि 'प्यासा' चित्रपटातील ह्याच गाण्याने प्रेरित होऊन आम्हाच्या चाळीतील एका प्रतिष्ठीत व्यक्तीने (मेलेल्या माणसाबद्धल वाईट लिहिणे बरोबर नव्हे, तेव्हा नाव नको) गाणे रचले आणि आम्हा लहान मुलांना त्याच गाण्याच्या चालीवर म्हणावयास सांगितले. पडत्या फळाची आज्ञा! सारीच मुले गाऊ लागलो, अगदी 'सर जो चकराये...'च्या चालीत.'धर धर धर, हातामध्ये धर. चाकू भोसकून खून त्याचा कर. कसा घाबरला, कसा पळाला, आता नाही येणार! कारे घाबरतोस, कारे घाबरतोस?' बाकी मुलांचे माहित नाही, पण मला मात्र चांगलाच ओरडा मिळाला, आईपासून बहिणींपर्यंत. त्यांचे गाणी रचण्याचे सत्र चालूच होते. मग 'इना मीना डिका'च्या चालीवर तयार झाले 'नानी, मीना कन्या'. कदाचित म्हणूनच असेल बिल्डींगमधल्या एका मुलाची तळेगावला-बोर्डींगला रवानगी झाली. जाण्यापूर्वी त्याच्या निरोप समारंभात तो म्हणाला देखील, ''चाळीत शिकलेलो सर्व वेडेचाळे विसरण्यासाठी मी तळेगावला, बोर्डींगमध्ये जात आहे आणि एक चांगला मुलगा बनूनच मी परत येईन.'' इतरांचे माहित नाही.त्यानंतर हे गाणे मी कधीच गायले नाही. पण त्या प्रसिद्ध माणसाने केलेले हे काव्य मात्र मी विसरू शकलो नाही. पण काय हो, ह्याला - अशा गचाळ लेखणीस, तुम्ही काव्य म्हणाल का?

गाण्यांवरून आठवले. चाळीत अनेक 'बाथरूम' सिंगर्स होते. पण काही चांगले गात. शेजारचा सतू सुंदर यॉडेलिंग करायचा. 'किशोर कुमारां'ची गाणी गाण्यात तो माहीर होता.

चाळीत सर्व सण साजरा करण्यात फार फार मजा येई. संक्रांतीला चाळीतील इतर मुले 'पत्र्यावर' जात. बिल्डींगच्या शेजारी (१ फूट अंतर) असलेल्या कारखान्याचे पत्र्याचे छप्पर व दुसऱ्या मजल्यावरील खिडकीतून शेरी ओलांडून पलीकडे त्या छप्परावर जाणे, म्हणजे पत्र्यावर जाणे. 'पत्रा' फार उपयोगी पडे. बिछाने उन्हात वाळत घालण्यापासून पापड वाळवण्यात आणि पतंग उडवण्यात. मला मात्र तेथे जाण्यास बंदी. मी तिसऱ्या माळ्यावरून संक्रांतीची धमाल बघत असे. मधुकाका त्यांनी आकाशात 'बदविलेल्या' पतंगाचा 'मांज्या' माझ्या हाती देत. त्यावरच मी समाधान मानी. काहीजण तर एखाद्या

(पान ६ कॉलम ३ वर)

# मुंबई बदलते आहे...


-उज्ज्वला गोविंदराव भगवंतराव आगासकर
बी. आर्क. (मुंबई), फोटोजरनॅलिस्ट

आपल्या ओळखीच्या किंवा नात्यांतल्या व्यक्तींचे स्वभाव, त्यांचं वागणं कसं आहे याचे आपल्याला अंदाज असतात. मात्र, मध्येच जर एखादी वेगळीच घटना घडली आणि त्या व्यक्तींच्या अनपेक्षित प्रतिक्रिया समोर आल्या तर आपण चक्रावून जातो, मनात म्हणतो की हे रूप काही वेगळंच आहे!

मी जेव्हा मुंबईचा इतिहास वाचते तेव्हा मुंबईचा भूगोल, वेगवेगळ्या काळांत इथे वावरलेल्या व्यक्ती आणि राजवटी, काही उद्देश नजरेसमोर ठेवून त्यांनी मुंबईसाठी, इथल्या जनतेसाठी कलेली धडपड आणि त्या साऱ्यांचे परिणाम, यांचा गोषवारा घेतांना मलादेखील चक्रावून जायला होते.

सन १६६१ मध्ये अनायासे हातात आलेल्या मुंबई बेटांच्या घबाडाचे, ब्रिटिशांनी विचारपूर्वक रूप बदलणे सुरू ठेवले. आपण किती जरी म्हटले की मुंबई आमची, तरी हे परके लोक जर इथे स्थिरावले नसते आणि त्यांनी परिश्रमपूर्वक सारी सात बेटे एकमेकांना जर जोडली नसती तर आपण अजून होड्या-मचव्यांतूनच इकडे तिकडे फिरलो असतो; असे माझे मत आहे. मुंबईच्या या रूपांतराचा एक अतिशय महत्त्वाचा घटक म्हणजे गिरगावच्या पश्चिमेला समुद्रात भर घालून बांधलेला मरीन ड्राइव्ह, ज्याने वाहतूक फारच सोयीची केली आणि त्याहून महत्त्वाचा दुसरा घटक म्हणजे मुंबई बेटाचे वायव्य टोक (हाजी अली पॉइंट) आणि वरळी बेटाचे वायव्य टोक (हाजीअली पॉइंट) आणि वरळी बेटाचे नैऋत्य टोक (लोटस थिएटर) जोडणारा वरळीचा बांध. या बांधाने (नदीच्या पात्रात बांध घातला तर त्याला धरण/डॅम म्हणतात, समुद्रात बांध घातला तर त्याला डीवायकेइ/डाईक असे नाव आहे) तर मुंबईच्या कारभाराची भविष्यातली सारी गणितेच बदलून टाकली. आज या बांधाबद्दल जरा बोलावे म्हणते.

(पान ५ कॉलम १ वर)




मुंबईची मूळची सात बेटे, आणि समुद्राचे पाणी अडवून भर घालून आकारास आणलेली सलग मुंबई. वरळीचा हॉर्नबी वेलार्ड १७८० मध्ये बांधला. तोपर्यंत पश्चिमेकडून समुद्राचे पाणी पार भायखळ्यापर्यंत येत होते हे या नकाशावरून लक्षात येईल.

थोडं बोलू या

# जरा विसावू या वळणावर

-श्रेया तळपदे

स्वत:ला आरशात न्याहाळत असणाऱ्या आपल्या डोळ्यांना नेमकं काय दिसत असतं? कोंडलेले मी त्या कोंडलि गेल्याची अगतिकता त्यातून नकळत आलेला हिंस्त्रपणा जो स्वत:लाच त्रास देतो. स्वत:चंच कपाळ आपटून घ्यावंसं वाटतं भिंतीवर. का? का वाटत असावं असं? चूक नक्की कोणाची, कोणामुळे, कशामुळे होतेय, ही कोंडी? चुकी ज्या माणसावर विश्वास ठेवल्यामुळे की आपण चुकीची निवड केल्यामुळे? कुठे कमी पडलो आपण? या प्रश्नाचा बुलडोजर मेंदूवर फिरत असताना सविताने दणादणा आपटलंच कपाळ भिंतीवर. नजर वर उचलली तर भिंतीचे आरसे झाले होते लाल आणि त्याच आरशातून सविताला न्याहाळून पाहणारे आई, वडिल बहिणीचे चेहरे दिसू लागले. एका अनोळखी व्यक्तीसाठी आपल्या लोकांना परकं करत आहोत याची साक्ष तिचे वाहणारे डोळे देऊ लागले. हे परकेपण माझे मीच ओढावून घेतले. त्याच जाणीवेच्या क्षणातून सविताने लावलेल्या प्रेमाच्या रोपाचा निरोप घ्यायचे ठरवले.

निरोप घेताना त्याच्या-तिच्या आठवणींचा काळोख गडद केला तिने. मनातील फुटलेल्या हुंदक्यांवर त्या काळोखाचाच दगड ठेवला. हुंदक्यांची पडझड आणि भोवताली धुळीनं भरलेली शांतता. आज सविताने पहिल्यांदा हृदयाच्या विरुद्ध मेंदूवर विश्वास ठेवला. आज गेल्या आठ वर्षात खत-पाणी घालून एक वादळ-वारे-ऊन सोसून जपलेला रोप मुळासकट उपटून काढलं. उपटतांना खोल रुतलेली मूळं बघून एका प्रश्नाने सविताला आयुष्यभर सतावलं, तो प्रश्न म्हणजे, एवढं सोसून ताठ मानेने उभं राहिलेलं रोप. जाणाऱ्या येणाऱ्याला हेवा वाटावं असं रोप एका मधमाशीमुळे विचलित झालंच कसं? त्या एका क्षणामुळे सविता भेदरली. हे रोप हळू-हळू जसं मोठं होईल त्यावर येणारी पाखरंही वाढतील आणि मग त्याचं परिवर्तन झाडात होईल त्या झाडाच्या फांद्या सविताच्या अंगणाबाहेर जातील. त्यावर इतर पक्षी आपली घरटी बांधतील. हे भयाण दृश्य तिला वास्तव म्हणून स्वीकारणं मान्य नव्हतं. म्हणून स्वत:च्या मनाच्या अंगणावर घाला घालून मुळासकट उपटलं रोपाला. तरीसुद्धा... तरीसुद्धा...

कंठात उगवतो कधी-कधी तुझ्या विषयीचा हुंदका सूर्योदयासारखा तळहात उजळणारा...

आज सविता पन्नाशीत पदार्पण करतेय. आज मात्र तिच्या मनात ना ते रोप - ना निरोप... आज आरशात न्याहाळताना स्वत:ला सविताचे डोळे सांगतायत...

''भले-बुरे ते घडून गेले, विसरून जाऊ सारे क्षणभर, जरा विसावू या वळणावर.... या वळणावर...''

*



दादरच्या पश्चिमेला कॅडेल रोड उत्तरेकडे सुरू होतो त्या ठिकाणी, शंभर वर्षांपूर्वी अगदी छोट्याशा मंदिरात वसलेल्या श्री सिद्धीविनायकाने भक्तांना दिलेल्या कृपाप्रसादामुळे तेथे भक्तांची सतत रीघ आणि छोट्या मंदिराचे महाप्रशस्त मंदिरात रूपांतर झालेले दिसते

नवलCURRY

# दिनचर्या...

**सौ. मुकुला प्रदीप नवलकर**

मोबाईलवर गजर झाला आणि बिछान्यावर पडल्या पडल्या, आधी प्रभातचिंतनाचा शुभसंदेश आप्तस्वकीय आणि यच्चयावत स्नेहांकीत मित्रसंघावर टाकला, तसे लगेच उजाडले.

अगदी न चुकता, न विसरता सकाळचे महत्त्वाचे आन्हिक पार पडले.

।।प्रभाते मनी राम चिंतीत जावा. पुढे वैखरी राम आधी वदावा।।

आता तो खाली ठेवणार, तोच मोबाइलमध्ये संचार झाला. रोमहर्षित होत तो थरथरु लागला. न्यूटनच्या नियमानुसार, त्याच्यावर Equal, Opposite and Simultaneous मेसेज आले होते. ते न वाचता, चित्रांवरून आजचे निर्णायक पंचांग कळले. शुभकामनांची तर खात्रीच होती. पलंगावरून उतरायला आता हरकत नाही. ।।विष्णुपत्नी नमस्तुभ्यं, पाद:स्पर्शम् क्षमस्वमे।।

त्यानंतरचे प्रबोधनात्मक पुण्यकर्म म्हणजे आलेले संदेश copy, paste, forward या त्रिसूत्रीन्वये, ह्याचे त्याला आणि त्याचे ह्याला पाठवून अवघ्या जनांना सुपंथाला लावणे. ।।जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे।।

हे प्रतिदिनी हजेरी देणारे आणि घेणारेही संदेश म्हणजे ।।सर्वे भवन्तु सुखिन: सर्वे सन्तु निरामया।। असामनुवंश उत्थान हेतू, अंत:करणपूर्वक केलेला, समाजाभिमुख उदात्त प्रयत्न असतो.

या उद्‌बोधक अक्षरसंवादात मुख्यत्वे प्रेम, सेवा, दया, माया, त्याग, स्वार्थ, अहंकार, मीपणा, मोठेपणा, खोटेपणा या बहुचर्चित सार्वजनिक विषयांवर साद्यंत उहापोह, भरपूर वचनं आणि मन:पूर्वक सल्लेही असतात.

हे हितचिंतन, तेव्हाच क्षणभर थांबून, शांतपणे मन लावून वाचले; तर रोजच्या अनेक प्रश्नांची उत्तरे यात मिळतील. अनेक दैनिक समस्यांची उकल हाती लागेल. अवघड परिस्थिती हाताळायला मार्ग सापडेल. कारण ह्या सगळ्यांमागचा मूलभूत विचार आपल्या संस्कृतीत घट्ट रुजला आहे. ह्यातून मिळणारे पूर्वसूरींचे अनुभवी मार्गदर्शन आजही उपयुक्तच आहे. त्याचवेळी आजच्या काळाचे प्रातिनिधीक विचार अविष्करणं ही स्वागतार्हच आहेत. म्हणून तर सध्याच्या शारीरिक धावपळीच्या, वैचारिक कुपोषणाच्या आणि मानसिक भावशुष्कतेच्या जगण्यातील, ह्या अल्प-स्वल्पविचारांना खरंतर खूप महत्त्व आहे. परन्तु यात अडचण हीच आहे की, हे सारे मूल्यमापन, आपल्या आयुष्याशी ताडून पहाण्याची तोशीश न घेता, प्रचारकी थाटात केवळ प्रसारित करण्यातच धन्यता वाटते आहे. थोडक्यात काय? ।।शहाणे करुनी सोडावे सकळ जन।।

कौटुंबिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रातील घडामोडी आणि त्यावर वैयक्तिक भाष्य, आग्रही मते, छातीठोक अंदाज हिरीरीने मांडले जातात, तेव्हा या धकाधकीच्या जीवनात आणि आजच्या आव्हानात्मक घडीला, सोशलमिडिया ही किती चपखल व्यवस्था आहे हे लक्षात येते.

कुणाला घरी बोलवायला नको की उठून कोणाकडे जायला नको. जेव्हा सय येईल तेव्हा एकमेकांशी बोलता येते, ऐकता येते. गप्पा मारता येतात. अगदी कानगोष्टीही करता येतात. एखादी नवी खरेदी दाखवायचीच असेल तर तीही सोय आहे. पुन्हा जामानिमा आणि तयारी नको की बाहेर पडून दगदगीचा प्रवासही नको. घर आवरणे नाही की ऐठोबैठो नाही. आणि हो, चहा खाणे बनविणेही नाही.

तरी ''आज काय मेन्यू'' पासून ट्राफिक, गर्दी, पाऊस यांचा इत्थंभूत सचित्र वृत्तांत,घरबसल्या कळतो आणि कळविता येतो.

हे म्हणजे अगदी, Eating the cake and having it too म्हटले पाहिजे.

तसे जरी हे सोपे सोयीचे असते तरी 'याची देही याची डोळा' नसते याचं स्वाभाविक दु:ख मात्र वाटू शकते हे खरे.

आता ही सगळी समाजातील Virtual ऊठबस, जबाबदारीने सांभाळून पुन्हा पोटापाण्याचा व्यवसाय, भविष्याची तरतूद, कौटुंबिक जबाबदाऱ्या, म्हणजे तारेवरची कसरतच ठरते..!

बाकी कश्शाकश्शासाठी म्हणजे अगदी रोजच्या व्यवहारातील, प्रत्यक्षातील छोटे छोटे आनंद, समाधान, अनुभव यासाठी वेळ मिळत नाही आणि ताकदही नसतेच.

मग कुठे कमी, कुठे जास्त करीत, वेळप्रसंग निभावून न्यावे लागतात आणि त्यातच बघता बघता दिवस तर निघूनही जातो.

आता या सरत्या दिवसाबरोबर हा तळहातावरचा जगज्जेता सोबत घेऊन, वेळ कसा मजेत गेला या खुषीत, आजच्या दिवसाचा हिशेब, आजच संपवायचा असतो. तसा दण्डकच आहे आमच्या संस्कृतीत.

।।विहितमविहितं वा सर्वमेतत् क्षमस्व।। म्हटलं की मोकळे!

उद्या पुन्हा एक नवीन हेक्टीक दिवस सुरू. गजर सेट केला की तय्यार.

म्हणजे त्याचं कसं आहे, प्रत्येकाने काळासोबत चाललं पाहिजे. जगाच्या वेगाशी जुळवून घेतले पाहिजे. बदलत्या परिस्थितीशी स्वत:ला जोडले पाहिजे. मागे राहून चालणार नाही. हरवूनही जायचं नाही आणि थांबला तो संपला! म्हणूनच या, समाजसन्मुख सहसंवादातून ओळखीची वा अनोळखी, सम वा वैविध्यपूर्ण विचारी, कलासक्त आणि हरहुन्नरी माणसे, एकमेकांना परिचित व्हावीत, जोडली जावीत आणि मानववंशाच्या उत्कर्षात काही भरीव योगदान व्हावं, ही अपेक्षा आहे.

त्यासाठी आंतरजालावरील संकेतस्थळावर व्यक्त होताना भाषा, प्रांत, स्थळकाळ, संस्कृती, प्रदेश यांच्या पलीकडे, माणसांमाणसातील दुवे जोडले जावेत, हा प्रमुख हेतू आहे.

नजरेच्या टप्प्यात असूनही दिसत नाहीत आणि जवळ असूनही जाणवत नाहीत अशा अनेक गोष्टी, या माध्यमातून प्रकाशात येतात. सातासमुद्रापार, जगाच्या पाठीवरील गोष्टी अगदी रोजच्या सवयीच्या होतात. ही किमया याच माध्यमातून साधली जाते. पण हे साध्य करताना, वास्तव मात्र नजरेआड होते आहे आणि आभासी विश्वातही पाय टिकत नाही. परिणामी विवेक हरवून जगण्याचा तोल जाण्याची भीती असते आणि असं घडलं, तरीही रोजचं आयुष्य मात्र पुढे चालतच रहाते.

या रोजंदारीत आपल्या लक्षातही येत नाही की, वाटतो तसा हा सोशल मीडिया Free नाही. तुमचा अमूल्य वेळ, तुमचे स्वास्थ्य, तुमची सर्जनशील एकाग्रता... सारेसारेच इथे कवडी मोलाने खर्च होते आहे.

एखाद्या उपायोजितेची किंमत मोजताना पैसा खर्च झाला नाही, म्हणजे ते सगळे फुकट असते; या भ्रमातून बाहेर पडण्याची वेळ आली आहे. द्रव्य न वेचता परंतु वेळ दवडून आणि शक्तीचा व्यय करून, फुकट वा कमी किंमतीत काहीही पदरात पाडून घेणे, हा घोटाघोटाने चढणारा नशिला व्यवहार आहे आणि तुमच्या वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक सहजीवनावर अगदी दिनदहाडे, तुमच्या संमतीने आणि सहभागाने घातला जाणारा दरोडा आहे, हे लक्षात घेण्याचीही गरज आहे.

जीवन व्यवस्थापनातील महत्त्वाचे मानले जाते ते तत्त्व हेच सांगते, की जिथे काही विनामूल्य उपलब्ध आहे तिथे तुमचे स्वत:चे जगणेच दावणीला बांधले जाते आणि तेव्हा उपभोक्ता हा शोषणाचा पहिला आणि फुकाचा बळी ठरतो. म्हणून तर प्रत्येक स्तरावर, संयम आणि पथ्ये पाळणे आवश्यक व शहाणपणाचे ठरते.

स्वच्छ विचारांशी प्रामाणिक रहाल, तर हे माध्यम वरदान आहे! तडजोड कराल आणि वाहवत जाल, तर व्यवहारात तुम्ही नादान ठराल! आणि भ्रष्टबुद्धी तथा विकृत मनोवृत्तीचा नाद कराल, तर तुमची प्रतिमा आणि प्रतिष्ठा, धुळीस मिळून आयुष्य उद्‌ध्वस्त व्हायला वेळ लागणार नाही. म्हणून ज्याचे त्याने,आपले नैतिक नियमन, सांभाळले, तर त्यासाठी कोणत्याही Privacy Policy, Comments, Trolling किंवा Reviews यांची भीती बाळगण्याची गरज नाही. ही विज्ञानाची देणगी आपण आपल्या इच्छेने, आपल्या सोयीनुसार, निवडून, समजून उमजून वापरात आणायची आहे. त्याचवेळी, ही व्यवस्था आपल्यावर हावी होणार नाही याची दक्षताही आपणच घेतली पाहिजे.

आपली दिनचर्या ही आपल्या समग्र जीवनप्रवासाचा लघुतमपट आहे हे लक्षात घेऊन आपापल्या कुवतीनुसार, आपापल्या परिघात वावरताना, सांस्कृतिक बैठक आणि पुरोगामी विचार याचे भान ठेवून, हा नव्या युगातील पाहुणा आपल्या रोजच्या जगण्यात सामावून घेतला गेला पाहिजे; तरच खऱ्या अर्थाने ही मानवतेची प्रगती म्हणता येईल.

*

(पान ३ कॉलम २ वरून)

मुंबईचा कारभार हाकण्यासाठी ब्रिटिशांनी ईस्ट इंडिया कंपनीची नेमणूक केली होती. त्यांचा प्रमुख असे त्याला गव्हर्नर म्हणत. इथली परिस्थिती पाहून इथे कसा कारभार करावा, काय सुधारणा कराव्यात याचे आडाखे हे कर्तबगार गव्हर्नर आखत असत आणि लंडनहून भाग संपर्कात सहज येऊ शकेल हे या हॉर्नबीच्या लक्षात आले. त्यामुळे त्याने या रस्त्याचे अंदाजपत्रक तयार केले आणि ते मंजुरीसाठी लंडनला पाठवून दिले. तेथील उत्तराची वाट पहात असताना त्याने कामाची तयारी सुरू केली आणि बांधकाम ठेकेदार कोण नेमावा याची चौकशी सुरू केली. त्या काळी टपाल बोटीतून जात येत असे,



मुंबई पश्चिमेस, १७६४ मध्ये मुंबई बेटाचे उत्तर टोक आणि वरळी बेटाचे दक्षिण टोक जोडणारा बंधारा म्हणजे हॉर्नबी वेलार्ड बांधत असताना, कंत्राटदार रामजी शिवजी प्रभू (हे आपले जातवाले) यांना समुद्रतळाशी सापडलेल्या देवीच्या मूर्तीसाठी ब्रिटिश सरकारने दिलेल्या जागेवर रामजींनी बांधलेले महालक्ष्मी मंदिर

परवानगी मागत. ती मिळाली तर कारभार बिनबोभाट चाले. अन्यथा कुणी परस्पर स्वत:ची अक्कल पाजळली तर लंडनहून त्याची लगेच बदली करीत असत. म्हणजे तारेवरची कसरतच होती. ईस्ट इंडिया कंपनी इथे १६६८ ते १८६२ पर्यंत कारभार पहात होती. त्यानंतर १८६२ ते १९४७ पर्यंत राणीचे गव्हर्नर काम पहात. इथल्या सुधारणा करण्यासाठी मोठ्या खर्चाचा अंदाज असेल तर मुंबईमधल्या प्रतिष्ठितांना आवाहन करीत आणि बऱ्याच वेळा त्यांच्या देणग्यांमधूनच रस्ते, पूल यांची बांधकामे पार पडत असत. (माहीमचे उत्तर टोक आणि वांद्र्याचे दक्षिण टोक जोडणारा समुद्री सेतू हा लेडी जमशेटजी यांच्या देणगीमधून आकारास आला, हे एक उदाहरण. पारशी लोकांचा अशा कामांना देणग्या देण्यात मोठा पुढाकार असे.)

गव्हर्नर म्हणून नेमणूक होऊन मुंबईला आलेले विल्यम हॉर्नबी हे २६ फेब्रुवारी १७७१ पासून १ जानेवारी १७८४ पर्यंत कारकीर्द गाजवीत होते. संपूर्ण मुंबईच्या सगळ्या अडचणी सोडवण्याचे त्यांचे ध्येय होते. मुंबई बेटाचे वायव्य टोक जर वरळी बेटाच्या नैऋत्य टोकाला रस्त्याने जोडले तर रहदारी वाढेल, कारभार वाढेल. तेथून पुढे उत्तरेस माहीम बेट आणि माहीमच्या उत्तरेचा सारा जमिनीचा अर्थात् खूप वेळ जाई. हॉर्नबीला लंडनहून उत्तर आले तेव्हा त्यात लिहिले होते की सध्याचा कारभार समाधानकारक आहे, या बंधाऱ्यासाठी एक लाख दहा हजार इतकी प्रचंड रक्कम वाया घालवण्याचे काही कारण नाही. सबब मंजुरी नाही. एवढे झाल्यावर हॉर्नबीने मुंबईतल्या धनाढ्यांना मदतीचे आवाहन केले. त्याला प्रतिसाद देऊन मॅडम नेसबिट नावाच्या एका जागरूक महिलेने ती रक्कम गव्हर्नरकडे सुपूर्द केली, आणि हॉर्नबीने काम सुरू केले. नामंजुरीकडे दुर्लक्ष केल्याबद्दल कारवाई झाल्यास, सरकारचा खर्च वाचवला आहे, नागरिकांकडून मिळविला आहे, असे उत्तर त्याने तयार ठेवले होते. एवढ्या मोठ्या कामाचा ठेका घ्यायला ठेकेदार पुढे येईनात. रामजी शिवजी परभू (हे आपले जातवाले) यांनी हे काम पार पाडण्याची जबाबदारी स्वीकारली, आणि दररोज गलबते भरून दगडमाती समुद्रातून या ठिकाणी येऊ लागली.

या ठिकाणी कथानकाला एक सुरस वळण मिळते. दररोज समुद्रतळाशी ओतलेली सर्व दगडमाती सकाळी वाहून गेलेली असे. असे महिनाभर चालले. तेव्हा एकदा रामजी शिवजीच्या स्वप्नात येऊन देवीने दृष्टांत दिला की



पाटीलबाईंनी उभारलेले, मुळातले छोटेसे सिद्धीविनायक मंदिर, दीपमाळा, शेजारी उद्यान
(छायाचित्र सौजन्य: मा. नितीन साळुंखे, इतिहास संशोधक)

''समुद्रतळाशी माझी मूर्ती आहे, तिला बाहेर काढून तिची प्रतिष्ठापना कर, तरच हे काम पूर्ण होईल.'' रामजीने भीतभीत ही गोष्ट हॉर्नबीसाहेबाच्या कानावर घातली आणि परवानगी मागितली. साहेबाला कामाचे टेन्शन होतेच. त्याने परवानगी दिली, रामजी शिवजीने गलबते थांबवली, होड्यांमधून समुद्रात जाळी टाकली. आश्चर्य म्हणजे थोड्या दिवसात जाळ्यामध्ये - महाकाली - महालक्ष्मी - महासरस्वतीची मूर्ती आली. तेव्हा हॉर्नबीसाहेबाने मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यासाठी बेटावरच्या पश्चिम कोपऱ्याची टेकडी मंजूर केली. तेथे रामजी शिवजी यांनी छोटेसे मंदिर बांधून तेथे विधिवत प्रतिष्ठापना केली आणि त्यानंतर बंधाऱ्याचे काम झपाट्याने पूर्ण झाले. (१७७६-१७८०) जवळपास अर्धा मैल लांबीचा हा बंधारा पूर्ण झाल्यामुळे भरतीचे पाणी पश्चिमेकडून येणे बंद झाले व हळुहळू जमीन कोरडी झाली (हे पाणी पूर्वेकडे पार भायखळ्यापर्यंत येत असे, हे खरे वाटणार नाही. सरकारने जेव्हा जे. जे. हॉस्पिटल बांधले तेव्हा त्याच्या, समुद्रातल्या पाण्यात पडलेल्या प्रतिबिंबाचे फोटो मी पाहिले आहेत.) नंतर कोरड्या पडलेल्या या जमिनीवर बरीच भर घालून सरकारच्या हातात (समुद्रातून उगवलेली) अडीचशे एकर्स जमीन आली, तिथे मोठे रस्ते बांधून त्याच्याकडेचे प्लॉट्स् सरकारने विकणे सुरू केले, तेव्हा लंडनच्या सरकारची हॉर्नबीवरची इतराजी कमी झाली आणि त्यांनी हॉर्नबीचा इथला मुक्काम चार वर्षांनी वाढवला. या बंधाऱ्याला जनतेने प्रेमाने 'हॉर्नबी वेलार्ड' असे नाव दिले. त्याच्या पूर्वेसच मुंबईचा रेसकोर्स तयार केला.

प्रभादेवी भागात दादरला, गणपतीचे एक छोटेसे मंदिर पाटील नावाच्या महिलेने बांधले होते. या गणपतीच्या जागृत सामर्थ्याचा प्रत्यय जनतेला सतत येत गेला आणि तेथील वर्दळ तसेच मंदिराचे स्वरूप सतत वाढत गेले. आज हे मंदिर इंटरनॅशनल झाले आहे असे म्हणायला हरकत नाही. आपण नेहेमी म्हणतो की कळी उमलली, तिचे फुलात रुपांतर झाले. पण या सिद्धिविनायक मंदिराच्या कळीचे रूपांतर फुलात मर्यादित न राहाता, तिचा मोठा गुच्छच झाला आहे आणि तो सर्वांना आशीर्वाद देतो आहे! ।।इति।।

*

## पाठारे प्रभु महिला समाज
## वर्धापन दिन

दिनांक १८सप्टेंबर २०२२ रोजी खार येथील सांस्कृतिक सभागृहात सायंकाळी चार ते सात यावेळात रंगावली प्रदर्शन महिला समाजातर्फे भरविण्यात आले. या प्रसंगी प्रमुख पाहुण्या होत्या 'सामना 'च्या पत्रकार कल्पना सुनील राणे. एकूण चोवीस जणींचा रांगोळी प्रदर्शनात सहभाग होता. देखणे आरेखन, विषय आणि प्रकारांचे वैविध्य, कलात्मकता... यामुळे रांगोळया मनवेधक होत्या. उदाहरणार्थ -प्रणाली किर्तीकर यांनी लता मंगेशकर चित्रीत केली होती. डॉ. ज्ञानेश्वरी तळपदे यांनी पाण्यावरील आणि पाण्याखालील रांगोळी काढली होती. फुलांच्या रांगोळ्या होत्या. पैठणी साडीची कानी आणि पदर लोभस होता आणि पाहुण्यांच्या स्वागतासाठी या साडीला कल्पना साडी असे औचित्यपूर्ण नाव होते. येणा-या नवरात्राचे औचित्य साधून एक रांगोळी खण आणि त्यात देवी असे होते. विनीता नवलकरांची निसर्गचित्रे आल्हादक होती. सकाळपासून आलेल्या कलाकारांना महिला समाजातर्फे नाश्ता आणि जेवण देण्यात आले तर सर्व प्रेक्षकांना कॉफी देण्यात आली. सहभागी कलाकारांना महिला समाजाच्या १०८व्या स्थापना दिनाचा मजकूर असलेले मग स्मृतिचिन्ह म्हणून देण्यात आले. महिला समाजाला अशा उपक्रमाबद्दल शुभेच्छा.

## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे,
कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर,
कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक
३२) कै. सौ. विजया व श्री. प्रकाश माधव नायक या त्यांच्या आईवडिलांच्या स्मृत्यर्थ उन्मेष प्रकाश नायक
३३) सौ. वृंदा आणि श्री. शाम विनायक जयकर
३४) कै. श्रीमती जयश्री आणि कै. श्री. जयवंत विश्वनाथ कीर्तिकर स्मृत्यर्थ श्री. उमेशचंद्र जयवंत कीर्तिकर
३५) कै. श्रीमती प्रतिमा आणि कै. श्री. धाकलेश्वर बाळाजी जयकर स्मृत्यर्थ सौ. सुप्रिया उमेश कीर्तिकर

## प्रभुतरुणाची डायरी

**मरण**

| | | | |
|---|---|---|---|
| १९-८-२२ | श्रीम. पद्मा आनंदराव त्रिलोकेकर, | वय ९१, | गोवा |
| १२-९-२२ | श्रीम. ईना भोलानाथ तळपदे, | वय ८६, | पुणे |
| ३०-९-२२ | श्री. विजय आनंदराव धुरंधर | वय ७६ | ठाणे |

## प्रभुतरुणास देणगी

प्रभुतरुणाच्या वर्धापनदिना-निमित्ताने

* डॉ. अंबरीष विजयकर १०,०००/-
* सौ. निलिमा सुजन राणे १०,०००/-
* डॉ. प्रदीप गजानन विजयकर १०,०००/-
* सौ. संजीवनी संजय परब ५००१/-
* सौ. भक्ती शेटये २०००/-
* सौ. बागेश्री आणि श्री योगेन परीख २०००/-
* सौ. योगिता आणि श्री. किरण चं. नवलकर २०००/-
* सौ. प्रतिमा आणि विनोद प्रधान २०००/-
* सौ. नीलन आणि श्री दीपक विजयकर १०००/-
* सौ. नीता आणि श्री. दीपक विजयकर १०००/-
* सौ. सुरूची आणि श्री अनिल प्रधान ५००/-

देणगीदारांचे मन:पूर्वक आभार

## अभिनंदन

∗ गणपती उत्सवानिमित्ताने मिड डे, मुंबई वृत्तान्त, सकाळ, प्रहार... आदी वृत्तपत्रांनी पाठारे प्रभु ज्ञातीतील काही परंपरागत गणेशमूर्ती आणि मांडणीची विशेष दखल घेतली. त्यात श्री. विश्वास अजिंक्य यांचा १७८ वर्षांची सहा पिढ्यांचा परंपरागत गणपती, श्री. उदय झावबा यांच्या घरचा वैशिष्ट्यपूर्ण गणपती आणि सॉलि. राजन जयकर यांचा तांदळाचा आरेखित गणपती यांचा समावेश होता. त्याचप्रमाणे सॉलि. मोहन जयकरांच्या घरची गौर वेबसाईटवर दाखविण्यात आली. हे सारे वाचताना, पहाताना अभिमान वाटला.

∗ भाऊचा धक्का' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या परिसरातील कर्नाक बंदरचा पूल पुनर्बांधणीसाठी तोडण्यात आला. 'टाइम्स ऑफ इंडिया'त त्याचा फोटोसह वृत्तान्त देताना म्हटले आहे की 'हा पूल १८६७ मध्ये उद्योजक लक्ष्मण हरिश्चंद्र अजिंक्य यांनी बांधला होता. याच लक्ष्मणरावांना 'भाऊ' म्हणून ओळखले जात होते. त्यामुळे त्यांनी बांधलेल्या बंदराला 'भाऊचा धक्का' हे नाव पडले. ही इतिहासाची सोनेरी पाने पुन्हा फडफडली... आनंद झाला.

∗ डॉ. सुमन नवलकर यांच्या आंधळी कोशिंबीर या बालकवित ा संग्रहाला साने गुरुजी कथामाला सोलापूरतर्फे सौ. निर्मला स्मृती बालसाहित्य सेवा पुरस्कार लाभला.

सर्वांचे मन:पूर्वक अभिनंदन.

∗

### चुकीची दुरुस्ती

मागील अंकात देणगीदारांच्या यादीत सौ. नीता आणि श्री. मिलिंद मनोहर सेंजीत असे वाचावे. ते अनावधाने मिलींद शंकर सेंजीत असे छापले गेले आहे. दिलगीर आहोत.

रूढीप्रमाणे संक्रांतीची तयारी करीत. शरदला फक्त पतंग पकडण्यात रस. मग तो दोन-तीन काठ्या एकावर एक बांधी आणि वरच्या टोकास एक लहान झाडाची फांदी लावी. हा 'सोटा' घेऊन तो कापलेल्या पतंगामागे पत्र्यावर धावत सुटे. दिवसभरात ५-६ 'कोड' पतंग पकडत असे पण उडवणे मात्र नाही. शरदचे क्रिकेट खेळतानाही असेच. खेळायचे नाही, पण त्याची आम्हाला मदत फार. जिन्यावरील काचेचा दिवा (इलेक्ट्रिक बल्ब) काढणे आणि खेळून झाल्यावर तो परत जागेवर लावणे, वेणीच्या सुतांचे 'नेट' तयार करून दादरावरील खिडकीस लावणे जेणे करून चेंडू (बॉल) खाली रस्त्यावर किंवा समोरील तळमजल्यावर धराधरांच्या अथवा पहिल्या माळ्यावरील देसाईंच्या घरी जाणार नाही. बॉल चुकून धराधरांकडे गेलाच तर तो जप्त झालाच. म्हणूनच नेट. हे झाले शरदचे. बिल्डींगमध्ये ३ अरविंद. एक बेबीताईचा (सिनिअर मोस्ट) अरविंद (माझ्या मावस बहिणीचा नवरा), दुसरा अक्कांचा अरविंद आणि तिसरा संतोषचा मोठाभाऊ अरविंद नवलकर. अक्कांचा अरविंद ५-६ रात्री जागून संक्रांतीसाठी धार-धार 'मांज्या' तयार करायचा. बाहेर प्यासेजच्या भिंतीला ६-७ फुटांच्या अंतरावर दोन खिळे ठोकणे, त्या भवती 'कोंबडा' छाप सुतळीचे वेटोळे घालणे (लग्नात नवरा-बायकोला घालतात त्याप्रमाणे), सुतळीस 'लुबदि' घासणे, सुतळी सुकवणे, सुकलेला 'मांज्या' फिरकीस गुंडाळणे, हा सारा खटाटोप. 'लुबदि' कशी तयार करतो हे मात्र माझ्याशिवाय तो कोणालाच सांगत नसे. माझ्याबरोबर त्याने 'शेअर' केलेले 'लुबदि' सिकरेट असे आहे. खलबत्यात औषधाच्या रिकाम्या बाटल्यांचा (त्यावेळी तो दारू पीत नव्हता) चुरा करणे, ५-६ अंडी, तांदुळाचे पीठ, पाणी व शिरस/लय/चिकटगोंध आणि काचेचा चुरा ह्याचे चांगले मिश्रण तयार करून लगदा बनवणे आणि बनते लुबदी. कशी वाटली आमची रेसिपी? नाही, मी तुमची फिरकी घेत नाही!

दिवाळीपूर्वी रात्र रात्र जागून मोठी मुले लहान-मोठी 'अनारे', आपट बॉम्ब, पणत्या असे फटाके आणि सुंदर सुंदर आकाश कंदील बनवीत. त्या अनारातून उडणाऱ्या फुलरुपी/चांदण्यारुपी ठिणग्या अतिशय मोहक वाटायच्या आणि फार उंचही उडत, सहज ३-४ मजले. रात्र जागून कोजागरी साजरी करण्यात फार धमाल येत असे. सारे, आम्हा लहानापासून मोठ्यापर्यंत आट्या-पाट्या खेळायचो.

दिवाळीत कमळाबाई शाळेच्या हॉलमध्ये वाडीतील मुल-मुली विविध कार्यक्रम करीत. नाटक, गाणी, वेशभूषा बरेच काही. मला आठवते, प्रेक्षकातून प्रवेश घेत स्टेजकडे जात असलेली ती 'तहान्या दुधाची र, मला लुगड भी न्हाय...' भिकारीण झालेला कदमांचा `BMR' अवि (त्यांच्याच ग्रुपने ठेवलेले टोपण नाव) - त्याने पहिले प्राईझ घेतले आणि समेळांचा सुधाकर 'नाना' झाला होता 'टाकी वाली'. त्यावेळी मुलींनी (निमा, उषा, किशोरी, क्षमा) सादर केलेला डान्स टेब्लो देखील आठवतो. फार मजा होती हो!

रामनवमीला आम्ही लहान मुले आपआपल्या दरवाज्यात 'राम-मंदिरे' तयार करायचो आणि मेहनत घेऊन आकर्षक सजावट करायचो. चाळीतील वडीलधारी मंडळी येऊन प्रोत्साहन देत.

## परीक्षेतील सुयश

**बी.ए. (मल्टिमीडिया ॲण्ड मास कम्युनिकेशन)**

कु. गार्गी आशय तळपदे
७७.७२ टक्के

∗

## पाठारे प्रभु सोशल समाज

पाठारे प्रभु सोशल समाजाचा वार्षिक अहवाल सभासदांना घरपोच प्राप्त झाला. अकरा सप्टेंबरला होणाऱ्या वार्षिक सर्वसाधारण सभेची त्यात सूचना असून वार्षिक सभांचा वृत्तान्त आणि आर्थिक हिशोबाचा या अहवालात समावेश आहे.

हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४००१०२ येथे प्रकाशित केले.

संपादक: श्रीमती सुहासिनी कीर्तिकर RNI NO. 14613/67